# Washim District Police

**Nature of Work** :- **Food Distribution to Poor Peoples in slum**

**Police Station** :- **Risod**

**Date of Good Work done** :- **31/03/2020**

**Brief of the work done :-**

रिसोड संरक्षण अन जेवण देणारे पोलीस माणसे दि. ३१/०३/२०२०



# संरक्षण अन् जेवण देणारे पोलिस माणसे

**डॉ.प्रल्हाद कोकाटे/प्रदिप खंडारे**

**रिसोड :** कोरोना सारख्या महाभयंकर संसर्गजन्य आजाराने सर्वच जगाला पछाडले असून त्याने भारतात सुद्धा शिरकाव केला आहे. त्यामुळे सर्वच हातावर पोट असणाऱ्या लोकांना रोजगार तर नाहीच पण दोन वेळेच्या जेवणाच्या अडचणी येत आहेत आपल्या पोटाच्या गोळ्याला जगवायचं कस असा मोठा प्रश्न त्यासमोर उभा आहे.नगर परिषद च्या जवळ असलेल्या जिजाऊ नगरातील नागरिकांच्या रोजच्या खाण्याच्या अडचणी आहेत हे समजताच रिसोड पोलीस स्टेशन चे ठाणेदार अनिल ठाकरे यांनी त्या सर्व नागरिकांना त्वरित संपर्क साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व त्यांच्या जेवणाची व्यवस्था केली तसेच त्यांना नित्योपयोगी वस्तू त्यामध्ये, गव्हाचे पीठ, साखर, तेल, पत्ति, मीठ तिखट असल्या सर्वच वस्तूचे वाटप केले, आजपासून त्यांना रोजच सकाळचे जेवण व संध्याकाळी खिचडी देण्यात येणार असल्याचे सांगितले या कामी रिसोड पोलीस स्टेशन चे ठाणेदार अनिल ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय अनिल सिरसाट, एपीआय गवई,पोलीस शिपाई सतिष बांगर,पोलीस शिपाई किशोर अंभोरे, पोलीस शिपाई गुरू वानखेडे,पोलीस मित्र कायंदे व पोलीस स्टेशन मधील सर्वच कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.अश्या कठीण प्रसंगी समाजातील सर्व धनदांडग्या लोकांनी समोर येऊन ठाणेदार साहेबांचा आदर्श घेऊन दोन वेळच्या जेवनपासून वंचित असलेल्या नागरिकांना मदतीचा हात द्यावा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे रिसोड तालुकाध्यक्ष डॉ. प्रल्हाद कोकाटे व शहराध्यक्ष प्रदिप खंडारे यांनी केले आहे.

*रिसोड पो.स्टे.चे ठाणेदार अनिल ठाकरे यांचा स्तुत्य उपक्रम

* जिजाऊ नगरातील नागरिकांना जेवण

*सर्वच स्तरातून कौतुक

*समाजातील धनदांडग्या लोकांनी मदतीसाठी समोर येण्याचे आवाहन